# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५६ /२०१०

अर्जदार : श्री मनोहर सखाराम लोखंडे
राहणार सिंदी, तालुका कळमेश्वर,
जिल्हा नागपुर

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
विभाग क्रंमाक २
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपुर.

गणपुर्ती : 1) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपुर.

2) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपुर.

–– आदेश ––

पारीत दि. २६.०८.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक २७. ०७.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ६.४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील</u> :–

१. अर्जदार श्री मनोहर सखाराम लोखंडे, राहणार सिंदी, तालुका कळमेश्वर, जिल्हा नागपुर, यांनी गैरअर्जदाराशी शेतीपंपाच्या विद्युत देयक दुरूस्तीबाबत वर्ष २००२ पासुन पाठ पुरावा करूनही गैरअर्जदारातर्फे त्याची कुठलीही दखल घेण्यात आली नाही. तेव्हा दिनांक ०६.०५.२०१० रोजी त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, नागपुर ग्रामीण मंडळ, येथे शेतीपंपाच्या विद्युत देयकाच्या दुरूस्तीबाबत तक्रार दाखल केली होती. परंतु पुढे कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे अर्जदाराने दिनांक २७.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली की–

   अ. विहीरीत कमीपाणी असल्याने विजेचा वापर कमी आहे, तेव्हा शेती पंपाच्या विद्युत देयकात नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे देयक दुरूस्त करून देण्यात यावे.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या पत्रात असे नमुद केले आहे की त्यांची दोन एकर शेती आहे व विहीरीत कमी पाणी असल्याने विजेचा वापर फारच कमी आहे. तसेच त्यांनी गैरअर्जदाराला या विषयी तक्रार अर्ज वर्ष २००२ पासुन आतापर्यंत केला आहे परंतु याची गैरअर्जदाराने कुठलीही दखल घेतली नाही. तसेच गैरअर्जदारातर्फे जुन २०१० मध्ये अर्जदाराचा शेतीपंपाचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आला आहे.

अर्जदाराने असे ही नमुद केले आहे की त्यांचा गैरअर्जदाराशी पत्र व्यवहार वर्ष २००२ पासुन सुरू आहे व सर्व पत्रात गैरअर्जदारास असे कळविले आहे की विहीरीत पाणी कमी असल्याने विजेचा वापर फक्त अर्धातास असतो. तसेच त्यांच्याकडे शेतीकरीता ओलीत नोव्हेबंर ते मार्च हया कालावधीतच होते आणि इतर महिन्यात फक्त बैलांना पाणी पाजण्याकरीता पंपाचा वापर होतो.

.

३. अर्जदाराने पुढे असेही नमुद केले आहे की त्याचे जुने मीटर ऑगष्ट २००८ मध्ये बदलविण्यात आले आहे. त्यावेळी त्या मीटरवर १२५० इतके वाचन होते. परंतु गैरअर्जदाराने जवळपास ५००० अतिरिक्त युनिटचे देयक देवुन त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. तेव्हा मीटर वाचनानुसार विद्युत देयकात दुरूस्ती करण्यात यावी. तसेच आकारण्यात आलेले अतिरिक्त युनिटस रद्द करण्यात यावे आणि नवीन व जुने मीटरच्या वाचनानुसार विद्युत देयकात योग्य ती दुरूस्ती करण्यात यावी, अशी विनंती अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या अर्जात केली आहे.

४. दिनांक १२.०८.२०१० रोजी गैरअर्जदाराने आपले उत्तर मंचात दाखल केले आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की विद्युत देयकाची तक्रार असलेली विज जोडणी श्री. सखाराम उकंडराव लोखंडे, यांच्या नावावर असुन त्यांचा ग्राहक क्रं. ४१९३७०२५६४४७ आहे व अर्जदार त्यांच्या मुलगा आहे तसेच अर्जदाराचा विद्युत देयक मार्च २०१० मध्ये दुरूस्त करण्यात आलेले आहे. त्यामध्ये संप्टेबर २००८ ते मार्च २०१० पर्यंत एकुण २५३९ चे रू. १२२५.१६ रक्कम असलेले विद्युत देयक ग्राहकाला देण्यात आले होते.

५. गैरअर्जदाराने पुढे असेही नमुद केले आहे की अर्जदाराचे मीटर १९.०७. २००८ रोजी बदलविण्यात आले आहे. ते मीटर सिंगल फेज चे असुन फॉल्टी

आहे व शेवटचे मीटर वाचन १२५० इतके आहे. तसेच नवीन मीटरचे सुरूवातीचे वाचन ०००१५ होते व दिनांक २०.०५.२०१० रोजी घेण्यात आलेले वाचन ००३३५ होते. तेव्हा मीटर वाचनानुसार वापरण्यात आलेल्या ३२० युनिटचे, रू. ७९.२०/– रक्कम असलेले विद्युत देयक मार्च महिन्यात तयार केले आणि अतिरिक्त युनिटचे रू. १२२५.१६ रक्कम असलेल्या देयकातुन ते वजा करून रू. ११४५.९६ इतकी रक्कम बी–८० व्दारे अर्जदारास क्रेडीट देण्यात आली आहे. परंतु अर्जदाराचा विज पुरवठा जुन २०१० पासुन तात्पुरता खंडीत असतांना सुध्दा चुकीने जुन महिन्यात ५०० युनिटचे देयक अर्जदारास देण्यात आले होते. तेव्हा सदर देयकात दुरूस्ती करून बी–८० व्दारा रू. १००/– क्रेडीट देवुन शुन्य युनिटचे देयक अर्जदारास देण्यात आले आहे. तसेच सदर दुरूस्ती संप्टेबर २०१० च्या विद्युत देयकात दिसेल.

६. दिनांक १६.०८.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री. वी.पी. मानकर, सहाय्यक अभियंता, कळमेश्वर उपविभाग, हे उपस्थित होते.

अर्जदाराची बाजु श्री. मनोहर सखाराम लोखंडे यांनी मांडली. त्यांनी मंचाला सांगितले की गैरअर्जदारातर्फे विद्युत देयकात करण्यात आलेली दुरूस्ती त्यांना मान्य नाही, कारण की जुने व नवीन मीटरच्या वाचनानुसार करण्यात आलेली दुरूस्ती पुर्णपणे स्पष्ट होत नाही. तेव्हा दुरूस्त केलेले देयक समजावुन देण्यात यावे.

७. तेव्हा गैरअर्जदाराने मंचाला सांगितले की सदर ग्राहकाचा विज पुरवठा १९८५ साली करण्यात आलेला आहे. त्यांच्या विज जोडणीवर असलेले मीटर २००३ पासुन बंद असल्याने ते संप्टेबर २००८ मध्ये बदलविण्यात आले आहे. त्यांनतर नवीन मीटरच्या वाचनानुसार विद्युत देयकात दुरूस्ती करण्यात आली आहे.

तेव्हा मंचाने २००८ पुर्वीचे विद्युत देयक दुरूस्तीबाबत विचारणा केली असता, गैरअर्जदाराने सांगितले की अर्जदाराने २००४ मध्ये पैसे भरले होते, तेव्हा दिलेल्या देयकाबद्दल त्यांचा कुठलाही वाद नाही असे समजुन नवीन मीटर लावण्यानंतरचे विद्युत देयक मीटर वाचनानुसार दुरूस्त करण्यात आले आहे. यावर अर्जदाराने आक्षेप घेतला की त्यावेळेस चालु असलेल्या एका योजनचा लाभ घेण्याकरीता त्यांच्या तर्फे ती रक्कम भरण्यात आली होती व त्यांचा असा समज होता की जर योजनेचा लाभ घेतला तर तक्रारपुर्णपणे नाहीशी होणार. परंतु योजनेचा लाभ घेवुन सुध्दा विद्युत देयकात कोणतीही दुरूस्ती झाली नाही, असे अर्जदाराने मंचाला सांगितले.

८. मंचात दाखल केलेल्या कागदपत्रांवरून व दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर मंचाचे असे मत आहे की, अर्जदाराने त्यांच्या शेतीपंपाच्या चुकीच्या येणा—या विद्युत देयकाची तक्रार २००२ पासुन वारंवार गैरअर्जदारास केली आहे, परंतु गैरअर्जदाराने त्याची दखल मार्च २०१० मध्ये घेतली आहे. तसेच विद्युत देयकात दुरूस्ती फक्त नवीन मीटरच्या नोंदीनुसार केली आहे. तसेच गैरअर्जदाराच्या म्हणण्यानुसार मीटर संप्टेबर २००८ मध्ये बदलविण्यात आला व त्यावेळेस मीटरचे शेवटचे वाचन १२५० होते. परंतु सी.पी.एल. वरून जुन २००८ मध्ये मीटरचे वाचन ३९४२ युनिट असल्याचे लक्षात येते. यावरून मंचांचे असे मत आहे की अर्जदाराच्या शेती पंपाला लागलेले मीटरचे वाचन प्रत्यक्षरित्या न घेता गैरअर्जदाराने काल्पनिक नोंद करून मीटरचे वाचन वाढविले आहे व त्यानुसार अर्जदाराला देयक पाठविण्यात आले आहे. तसेच अर्जदाराने २००४ जी रक्कम भरली आहे त्याने संप्टेबर २००८ पुर्वीचा देयकाचा वाद संपत नाही असे मंचाचे मत आहे तेव्हा गैरअर्जदारातर्फे करण्यात आलेली देयकाची दुरूस्ती अपुर्ण आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग व्दारा पारीत विनियम, जानेवारी २००५ मध्ये अमलात आला आहे. तेव्हा जानेवारी २००५ अगोदरच्या देयकात दुरूस्ती या

विनियमाचा अधीन राहुन करणे मंचाला योग्य वाटत नाही तेव्हा सी.पी.एल वर डिसेंबर २००४ असेलेली थकबाकी रू. १६२३.७३ अर्जदाराला भरावी लागेल.

९. सी.पी.एल. बघता मीटर ना दुरूस्त दिसतो व गैरअर्जदारानेही सुनावणी दरम्यान कबुल केले आहे की जुन्या मीटर मध्ये नोंदी घेणे थांबले होते. तेव्हा म. रा. विज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहीता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ कलम १५.४.१ नुसार

"परंतु आणखी असे की, मीटरमध्ये नोंदी घेणे थांबले गेले असल्यास, ज्या महिन्यात नोंदी घेणे थांबले गेले असेल त्यांच्या मागील जास्तीत जास्त 3 महिन्यांपर्यंत, ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येणार आहे त्या महिन्यामागील बारा महिन्यांत मीटरवर नोंदल्या गेलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारीत, ग्राहकाचे देयक तयार करण्यात येईल".

परंतु सी.पी.एल वर असलेली नोंद प्रत्यक्ष मीटर वाचनाची नाही. तेव्हा अर्जदाराच्या मीटरचे वाचन न झाल्याने मागील बारा महिन्याच्या मीटरच्या वाचनाच्या नोंदी घेवुन सरासरीचे देयके देणे मंचाला उचित वाटत नाही. तसेच मागील वाचनाचा कुठलाही आधार नसल्याने मंचाचे असे मत आहे की नवीन मीटर लावल्यानंतर मीटरचे जो वापर असेल त्या आधारे जुने देयक दुरूस्त करण्यात यावे.

१०. तेव्हा मंचाचे असे मत आहे की नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे शेतीपंपाचा वापर एकसारखा असल्याने नवीन मीटरच्या नोंदी अनुसार सरासरी वापर काढावे. गैरअर्जदाराने मंचात सादर केलेल्या विद्युत देयकात दुरूस्ती पत्रावरून असे स्पष्ट होते की जुलै २००८ ते मार्च २०१० पर्यंत म्हणजेच २१ महिन्यांत ३३० युनिटचा वापर केला आहे. तेव्हा गैरअर्जदाराने सरासरी वापर या आधारे काढुन जुने देयक दुरूस्त करावे.

# आदेश

१. डिसेंबर २००४ ला सी.पी.एल. वर असलेली थकबाकी रू. १६२३.७३ अर्जदाराने भरावी.

२. मार्च २००५ ते संप्टेबर २००८ पर्यंत देयकातुन फक्त तीन महिन्याचे देयक नवीन मीटरच्या वापराच्या आधारे सरासरी वापर काढुन गैरअर्जदाराने वसुल करावे.

३. मीटर वाचनाच्या आधारे संप्टेबर २००८ नंतरच्या देयकात गैरअर्जदारातर्फे करण्यात आलेली दुरूस्तीची अंमलबजावणी करावी.

४. गैरअर्जदाराला आदेश देण्यात येतो की आदेशाची प्रत पाप्त झाल्यापासुन एक महिन्याचा आंत कार्यवाहीबद्दलचा अहवाल मंचात सादर करावा.

सही/–
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य – सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या्

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर